| अ.क्र | अपील क्र. | सुनावणीचा दि. 03.06.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| | | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 1 | 870/2024 | श्री. भास्कर शामराव जगताप, रा. कोटनांद्रा पो. तळणी ता. सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर | सहायक प्रशासन अधिकारी (साप्रवी), जिल्हा परिषद जालना | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवी), जिल्हा परिषद जालना | |
| 2 | 6264/2024 | श्री. कैलास दगडुबा गतखने, रा. घर क्र. 17 सी-01,एन-07, सिडको छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ.सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद जालना | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद जालना | |
| 3 | 6265/2024 | श्री. कैलास दगडुबा गतखने, रा. घर क्र. 17 सी-01,एन-07, सिडको छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ.सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद जालना | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद जालना | |
| 4 | 6266/2024 | श्री. कैलास दगडुबा गतखने, रा. घर क्र. 17 सी-01,एन-07, सिडको छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ.सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद जालना | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद जालना | |
| 5 | 1484/2024 | श्री. घनघावे प्रितम पंढरीनाथ, रा. प्लॉट नंबर 06, लुम्बिनी निवास, एकता नगर, जटवाडा रोड, हर्सुल छत्रपती संभाजीनगर | समज कल्याण विभाग, जिल्हा परिषद जालना | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद जालना | |
| 6 | 7783/2024 | श्री. बालासाहेब जनार्दनराव वरखडे, रा. लक्ष्मीकांतनगर घर नंबर 81, अंबड रोड, जालना | कनिष्ठ प्रशासन अधिकारी, महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद जालना | उपमुख्य कार्यकारी अधिकारी महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद जालना | |
| 7 | 599/2024 | श्री. बालासाहेब जनार्दनराव वरखडे, रा. लक्ष्मीकांनगर, घर नबंर 81, अंबड रोड, जालना-431213 | सहायक प्रशासन अधिकारी (साप्रवी), जिल्हा परिषद जालना | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवी), जिल्हा परिषद जालना | |
| 8 | 1499/2024 | श्री. बालासाहेब जनार्दनराव वरखडे, रा. लक्ष्मीकांतनगर, घर नबंर 81 अंबड रोड, जालना | ज.मा.अ. पंचायत विभाग, जिल्हा परिषद जालना | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद जालना | |
| 9 | 2035/2024 | श्री. रावसाहेब भिमराव काळदाते, मु.पो. आंबा ता. परतुर जि. जालना | गट विकास अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद जालना | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद जालना | |
| 10 | 7778/2024 | श्री. बालासाहेब जनार्दनराव वरखडे, रा. लक्ष्मीकांतनगर घर नबंर 81, अंबड रोड, जालना | कनिष्ठ प्रशासन अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद जालना | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद जालना | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 03.06.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 11 | 4479/2024 | श्री. किशोर बाबुराव मुन्नेमाणिक, रा. जांबसमर्थ ता. घनसावंगी जि. जालना | उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग अंबड जि. जालना | कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद जालना | |
| 12 | 6204/2024 | श्री. चाँद गुलाब पटेल, मु.पो. भाकरवाडी ता. बदनापुर जि. जालना | उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, जालना | कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद जालना | |
| 13 | 6205/2024 | श्री. चाँद गुलाब पटेल, मु.पो. भाकरवाडी ता. बदनापुर जि. जालना | उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, जालना | कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद जालना | |
| 14 | 6206/2024 | श्री. चाँद गुलाब पटेल, मु.पो. भाकरवाडी ता. बदनापुर जि. जालना | उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, जालना | कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद जालना | |
| 15 | 6207/2024 | श्री. चाँद गुलाब पटेल, मु.पो. भाकरवाडी ता. बदनापुर जि. जालना | उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, जालना | कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद जालना | |
| 16 | 8602/2024 | श्री. कांता बाबुराव कांबळे,रा. संजय नगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड | उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद जालना | कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद जालना | |
| 17 | 9097/2024 | श्री. गोरखनाथ रामचंद्र चौधरी, रा. आपेगांव ता. अंबड जि.जालना | उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद जालना | कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद जालना | |
| 18 | 10895/2024 | श्री. अमर कैलास भिंगारे, रा. माहोरा ता. जाफ्राबाद जि.जालना | उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद जालना | कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद जालना | |
| 19 | 10906/2024 | श्री. अमर कैलास भिंगारे, रा. माहोरा ता. जाफ्राबाद जि.जालना | उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद जालना | कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद जालना | |
| 20 | 10629/2024 | श्री. महेश शंकरलाल शंकरपेल्ली, रा. माँ दुर्गा निवास, शास्त्री कॉलनी सिल्लोड ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद जालना | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद जालना | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 03.06.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थींचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 21 | 10630/2024 | श्री. महेश शंकरलाल शंकरपेल्ली, रा. माँ दुर्गा निवास, शास्त्री कॉलनी सिल्लोड ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद जालना | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद जालना | |
| 22 | 8961/2024 | श्री. ज्ञानदेव दत्तात्रय काकडे, रा. जयपुर ता. मंठा जि.जालना | वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र दहीफळ खंदारे, ता. मंठा जि. जालना | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद जालना | |
| 23 | 1782/2024 | श्री. रमेश शशिकांत सोनवणे, मु. ताडहादगाव ता. अंबड जि. जालना | उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, अंबड जि. जालना | कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद जालना | |
| 24 | 5995/2024 | श्री. ताहेर हमद चाऊस, रा.पोलीस स्टेशन समोर, टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना | उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद जालना | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद जालना | |
| 25 | 5702/2024 | श्री. सुयोग अंबादासराव खेडेकर, रा. JES कॉलेज रोड, जालना | शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद जालना | शिक्षणधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद जालना | |
| 26 | 2466/2024 | श्री. राजेंद्र सर्जेराव सिनगारे, रा. कंडारी बु ता. बदनापुर जि.जालना | मुख्याध्यापक, श्री संत तुकाराम विद्यालय कंडारी बु ता.बदनापुर जि. जालना | शिक्षणधिकारी, जिल्हा परिषद जालना | |
| 27 | 8342/2024 | श्री. विजयकुमार दादाराव खरात, रा. प्लॉट नबंर 62, समर्थ नगर घाटी रोड, जालना | उप शिक्षणधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद जालना | शिक्षणधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद जालना | |
| 28 | 827/2024 | श्री. मोजस जोसेफ श्रीसुंदर, रा. प्लॉट नबंर 120, सरस्वती कॉलनी रेल्वेस्टेशन जवळ, जालना | शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद जालना | शिक्षणधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद जालना | |
| 29 | 5335/2024 | श्री. विजयकुमार भिवसनराव लहाने, रा. पुष्पकुंज अण्णाभाऊ साठे नगर, जाफ्राबाद ता. जाफ्राबाद जि. जालना | मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय भारज बु ता. जाफ्राबाद जि.जालना | शिक्षणधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद जालना | |
| 30 | 5986/2024 | श्री. प्रविण सुभाष पिपळे, रा. सोनगिरी पो.वरुड बु ता. जाफ्राबाद जि.जालना | शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद जालना | शिक्षणधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद जालना | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 03.06.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 31 | 10214/2024 | श्री. कृष्णा सुमंथन तांबे, व्दारा. गजानन गाडेकर लोकमान्य शाळेसमोर, घायाळनगर, जुना जालना | वेतन अधिक्षक शिक्षण विभाग माध्यामिक, भविष्य निर्वाह निधी पथक, जालना | शिक्षणाधिकारी (माध्यामिक), जिल्हा परिषद जालना | |
| 32 | 4088/2024 | श्री. ज्ञानदेव महादेव शेंबडे, रा. घोन्सी खु पो. म. चिंचोली ता. घनसावंगी जि. जालना | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय घोन्सी खु ता. घनसावंगी जि. जालना | विस्तार अधिकारी, पंचायत समिती घनसावंगी जि. जालना | |
| 33 | 4101/2024 | श्री. श्रीराम आश्रुबा तांगडे, रा जामसमर्थ ता. घनसावंगी जि. जालना | ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय घनसावंगी जि. जालना | गट विकास अधिकारी, पंचायत समिती घनसावंगी जि. जालना | |
| 34 | 4477/2024 | श्री. परमेश्वर कोंडीराम कांबळे, मु.पो. जांबसमर्थ ता. घनसावंगी जि. जालना | ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय घनसावंगी जि. जालना | गट विकास अधिकारी, पंचायत समिती घनसावंगी जि. जालना | |
| 35 | 4481/2024 | श्री. महेश प्रभाकरराव तांगडे, मु.पो. जांबसमर्थ ता. घनसावंगी जि. जालना | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय जांबसमर्थ ता. घनसावंगी जि. जालना | विस्तार अधिकारी, पंचायत समिती घनसावंगी जि. जालना | |
| 36 | 6098/2024 | श्री. रामेश्वर आसाराम साबळे, रा. एकदंत एन्केलेव्ह, सिद्दीविनायक सोसायटी, जांभुळवाडी रोड आंबेगाव -2 पुणे-411046 | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय गुंज (बु), ता. घनसावंगी जि. जालना | विस्तार अधिकारी, पंचायत समिती घनसावंगी जि. जालना | |
| 37 | 7584/2024 | श्री. मिलिंद दिनकर वाहुळे, रा. श्रीपतधामनगांव पो. कुंज (बु), ता. घनसावंगी जि. जालना | ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय घनसावंगी जि. जालना | गट विकास अधिकारी, पंचायत समिती घनसावंगी जि.जालना | |
| 38 | 7769/2024 | श्री.मंडपे गणेश दगडुबा, रा. परडगांव ता. घनसावंगी जि.जालना | सहाय्यक गट विकास अधिकारी, पंचायत समिती घनसावंगी जि.जालना | गट विकास अधिकारी, पंचायत समिती घनसावंगी जि.जालना | |
| 39 | 7771/2024 | श्री.मंडपे गणेश दगडुबा, रा. परडगांव ता. घनसावंगी जि.जालना | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय परडगाव ता. घनसावंगी जि.जालना | विस्तार अधिकारी पंचायत समिती घनसावंगी जि. जालना | |
| 40 | 10710/2024 | डॉ. वैभव तात्याबा घोगरे, रा. एन-07, आयोध्यानगर सिडको, F-3/8 छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय घनसावंगी जि.जालना | गट विकास अधिकारी,पंचयत समिती घनसावंगी जि.जालना | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 03.06.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 41 | 864/2024 | श्री. एच.एम.तावरे, मु.पो.चिकनगांव ता. अंबड जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा चिंचोली ता. भोकरदन जि. जालना | गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती भोकरदन जि. जालना | |
| 42 | 865/2024 | श्री. एच.एम.तावरे, मु.पो.चिकनगांव ता. अंबड जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा गोषेगाव ता. भोकरदन जि. जालना | गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती भोकरदन जि. जालना | |
| 43 | 4553/2024 | श्री. एच.एम. तावरे, मु.पो. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दानापुर ता. भोकरदन जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दानापुर ता. भोकरदन जि. जालना | |
| 44 | 4554/2024 | श्री. एच.एम. तावरे, मु.पो. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय भाकरवाडी ता. बदनापुर जि. जालना | विस्तार अधिकारी, पंचायत समिती बदनापुर जि. जालना | |
| 45 | 4555/2024 | श्री. एच.एम. तावरे, मु.पो. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय विल्हाडी ता. बदनापुर जि. जालना | विस्तार अधिकारी, पंचायत समिती बदनापुर जि. जालना | |
| 46 | 4556/2024 | श्री. एच.एम. तावरे, मु.पो. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय हालवोला ता. बदनापुर जि. जालना | विस्तार अधिकारी, पंचायत समिती बदनापुर जि. जालना | |
| 47 | 4557/2024 | श्री. एच.एम. तावरे, मु.पो. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कारला ता. जि. जालना | गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती जालना | |
| 48 | 4963/2024 | श्री. एच.एस. तावरे, मु.पो. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुतार पिंपळगाव ता. भोकरदन जि. जालना | गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती भोकरदन जि. जालना | |
| 49 | 4964/2024 | श्री. एच.एस. तावरे, मु.पो. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उटवद ता. जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उटवद ता. जि. जालना | |
| 50 | 4965/2024 | श्री. एच.एस. तावरे, मु.पो. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पारध ता. भोकरदन जि. जालना | गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती भोकरदन जि. जालना | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 03.06.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 51 | 4966/ 2024 | श्री. एच.एस. तावरे, मु.पो. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वालसांवगी ता. भोकरदन जि. जालना | गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती भोकरदन जि. जालना | |
| 52 | 4967/ 2024 | श्री. एच.एस. तावरे, मु.पो. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. लघु पाटबंधारे विभाग, जालना | कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, जालना | |
| 53 | 4968/ 2024 | श्री. एच.एस. तावरे, मु.पो. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राजुर ता. भोकरदन जि. जालना | गट शिक्षणधिकारी पंचायत समिती भोकरदन जि. जालना | |
| 54 | 6443/ 2024 | श्री. एच.एम.तावरे, रा. मु.पो. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंदापुर ता. जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंदापुर ता. जि. जालना | |
| 55 | 6444/ 2024 | श्री. एच.एम.तावरे, रा. मु.पो. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अहंकार देवुळगाव ता. जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अहंकार देवुळगाव ता. जि. जालना | |
| 56 | 6445/ 2024 | श्री. एच.एम.तावरे, रा. मु.पो. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गवळी पोखरी ता. जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गवळी पोखरी ता. जि. जालना | |
| 57 | 6446/ 2024 | श्री. एच.एम.तावरे, रा. मु.पो. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कल्याण प्रकल्प ता. जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कल्याण प्रकल्प ता. जि. जालना | |
| 58 | 6447/ 2024 | श्री. एच.एम.तावरे, रा. मु.पो. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पोकळ वडगाव ता. जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पोकळ वडगाव ता. जि. जालना | |
| 59 | 6448/ 2024 | श्री. एच.एम.तावरे, रा. मु.पो. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिरकल्याण ता. जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिरकल्याण ता. जि. जालना | |
| 60 | 8054/ 2024 | श्री.एच.एम.तावरे, रा. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बौनाडेवाडी ता. भोकदन जि.जालना | गट शिक्षणधिकारी, पंचायत समिती कार्यालय भोकरदन जि. जालना | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 03.06.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 61 | 8055/ 2024 | श्री.एच.एम.तावरे, रा. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिवेश्वरवाडी ता. भोकदन जि.जालना | गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय भोकरदन जि. जालना | |
| 62 | 8621/ 2024 | श्री. एच.एम.तावरे, रा. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र माहोरा ता. जाफ्राबादा जि. जालना | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद जालना | |
| 63 | 8624/ 2024 | श्री. एच.एम.तावरे, रा. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र टेंभुर्णी ता. जाफ्राबादा जि. जालना | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद जालना | |
| 64 | 8625/ 2024 | श्री. एच.एम.तावरे, रा. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र खासगाव ता. जाफ्राबादा जि. जालना | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद जालना | |
| 65 | 8626/ 2024 | श्री. एच.एम.तावरे, रा. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र खासगांव ता. जाफ्राबादा जि. जालना | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद जालना | |
| 66 | 8627/ 2024 | श्री. एच.एम.तावरे, रा. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र भारज बु ता. जाफ्राबादा जि. जालना | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद जालना | |
| 67 | 8784/ 2024 | श्री. एच.एम.तावरे, रा. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | उपविभागीय अभियंता जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, जालना | कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद जालना | |
| 68 | 8786/ 2024 | श्री. एच.एम.तावरे, रा. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | उपविभागीय अभियंता जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, जालना | कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद जालना | |
| 69 | 8787/ 2024 | श्री. एच.एम.तावरे, रा. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | उपविभागीय अभियंता जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, जालना | कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद जालना | |
| 70 | 8789/ 2024 | श्री. एच.एम.तावरे, रा. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | उपविभागीय अभियंता जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, जालना | कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद जालना | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 03.06.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 71 | 7865/2024 | श्री.एच.एम.तावरे, रा. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, जाफ्राबाद जि. जालना | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना | |
| 72 | 7866/2024 | श्री.एच.एम.तावरे, रा. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घनसावंगी जि. जालना | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना | |
| 73 | 7867/2024 | श्री.एच.एम.तावरे, रा. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मंठा जि. जालना | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना | |
| 74 | 7868/2024 | श्री.एच.एम.तावरे, रा. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, परतुर जि. जालना | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना | |
| 75 | 7869/2024 | श्री.एच.एम.तावरे, रा. चिकनगाव ता. अंबड जि. जालना | उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, भोकरदन जि. जालना | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना | |
| 76 | 9537/2024 | श्री. एच.एम.तावरे, मु.पो.चिकनगाव ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. राम रहिम विद्यालय सिपोरा बाजार ता. भोकरदन जि.जालना | मुख्याध्यापक, राम रहिम विद्यालय सिपोरा बाजार ता. भोकरदन जि.जालना | |
| 77 | 5010/2024 | श्री. सैय्यद मोबिन उद्दीन सैय्यद अल्लाउदिन, रा. घर क्र. 01-12-71, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. कै. मारोतराव देशमुख विद्यालय टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जालना | मुख्याध्यापक, कै. मारोतराव देशमुख विद्यालय टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जालना | |
| 78 | 11020/2024 | श्री. सैय्यद मोबिन उदिन सैय्यद अल्लाउदिन, रा. घर क्र.01-12-71, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. कै. मारोतराव देशमुख विद्यालय, टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना | मुख्याध्यापक, कै. मारोतराव देशमुख विद्यालय, टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना | |
| 79 | 11021/2024 | श्री. सैय्यद मोबिन उदिन सैय्यद अल्लाउदिन, रा. घर क्र.01-12-71, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. कै. मारोतराव देशमुख विद्यालय, टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना | मुख्याध्यापक, कै. मारोतराव देशमुख विद्यालय, टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना | |
| 80 | 6211/2024 | श्री. मनोहर बाबाराव धोंडे, रा. रो-हाऊस नंबर सी-05 खिंवसरा फोर्ट रिध्दी सिध्दी हॉलच्या पाठामागे, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य, प्लॉट नबंर 08, हॉटेल विकास लॉज छत्रपती संभाजीनगर रोड, जालना-431203 | सह आयुक्त, अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य 2 रा मजला, गट क्र. 19, पैठण रोड, कांचनवाडी छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -०८७०/२०२४**
**बोर्ड क्र.०१**

श्री. भास्कर शामराव जगताप, — अपिलार्थी
रा. कोटनांद्रा, पो. तळणी, ता. सिल्लोड,
जि. छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहाय्यक प्रकशासन अधिकारी (साप्रवी),
जिल्हा परिषद, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवी),
जिल्हा परिषद, जालना

**(सुनावणी दिनांक ०३.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२९.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०३.११.२०२३ | सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, जालना आस्थापणे वरील कार्यरत सहाय्यक प्रशासन अधिकारी श्री. रविंद्र प्रभाकर व्यास यांचे सर्व्हिस बुक प्रथम पानाची झेरॉक्स प्रत व मुळ नियुक्ती मिळवताना नोकरीवर रुजू होताना व पदोन्नती मिळवताना सादर केलेली शालेय पात्रता धारणाचे स्वातंत्र्य सैनिक पाल्य नाम निर्देशीत पत्र संचिका न्यायालयीन कामासाठी तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी दि.२३.०११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये,

कलम ८ (१) (त्र) अन्वये देता येत नाही असे कळविलेले आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती न्यायालयीन कामासाठी आवश्यक असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थांची वैयक्तिक मागणी केल्यामुळे त्रयस्थांना कळविले आणि त्यांनी माहिती उघड करण्यात नकार दिलेला असल्यामुळे अपिलार्थी यांना दि२३.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कलम ८ (१) (त्र) अन्वये देता येत नाही असे कळविलेले अहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१६.०१.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य ठरवून अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.६.०१.२०२४ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यास तोंडी नकार दिल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व घेतलेला निर्णय योग्य दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसूनयेत नाही. <u>अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक माहिती मागितल्याचे दिसून येत आहे,</u> अशी माहिती प्रकट केल्याने त्रयस्थाच्या खाजगी बाबीमध्ये आगंतुक हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशी माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) नुसार अपिलार्थीस देय होत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

अपिलार्थी यांचे द्वितीय निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 6185 दिनांक : 16/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६२६४/२०२४ ते ६२६६/२०२४**
**बोर्ड क्र.०२ ते ०४**

श्री. कैलास दगडूबा गतखने, — अपिलार्थी
रा. घर क्र.१७, सी-१, एन-७, सिडको,
छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, जालना

**(सुनावणी दिनांक ०३.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.११.०६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३१.०३.२०२४ | दि.०१.०१.२००९ ते ३१.०३२०२४ या कालावधीतील मा.शि.प्र.राजपूरकर, अवर सचिव, यांचे दि.क्र. संकीर्ण-२००९/सं.क्र./मुसस/६६८/आस्था-८ग्रा. वि. व. जलसं. वि. मंत्रालय मुंबई-४०००३२ दि.२८.०२.२००९ जा.क्र.जि.पजा/ साप्रवि/ प्रशासन/ २०१०/१४४३ दि.०५.०३.२०१० जा.क्र.जिपजा/ साप्रवि/प्रशा-०२/२०१८/१०५७/२०११ दि.३०.०५.२०१८ अन्वये सादर करण्यात आलेल्या अहवाल संपूर्ण फाईल टिपणीची छायांकित प्रती. याचिका क्र.५२५७/२०१० दाखल केली होती. मा.न्यायालयाने दि.१२.१२.२०११ रोजी मा. मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प. जालना यांना श्री. के.डी. गतखने यांना लघुलेखक निम्नश्रेणी पदावर सामावून बाबत योग्य तो निर्णय दिलेला आहे. याबाबत मा.मु.का.अ. यांनी काय निर्णय घेतलेला आहे. संपूर्ण फाईल टिपणीची |

| | |
|---|---|
| | छायांकित प्रती, श्री. कैलास दगडूबा गतखने यांनी याचिका क्र.८१६९/२०१५ अन्वये न्यायप्रविष्ठ आहे. मा. उच्च न्यायालय, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचे हुतुपुरस्कररित्या अवमान करुन व न्यायप्रविष्ठ असतांना श्री.के.डी. गतखने यांना वंचित ठेवण्यासाठी कोणत्या शासन निर्णयान्वये दि.०४.०८.२०२३ ची जाहिरात देण्यात आली त्या शासन निर्णयाची प्रत, संपूर्ण फाईल टिपणीची छायांकित प्रती मा. शरद यादव, कार्यासन अधिकारी, ग्रा.वि.वि.बांधकाम भवन मुंबई यांचे दि.२०.०२.२०१८ रोजीचे श्री. कैलास दगडूबा गतखने यांना जि.प. जालना येथील रिक्त असलेल्या सरळसेवेच्या ल.ले. निम्नश्रेणी या पदावर सामावून घेण्याबाबत मान्यतेचे आदेश मा.मु.का.अ.जि.प. जालना यांना देण्यात आलेल्या आदेशाची प्रत छायांकित प्रत व इतर |
| ३१.०३.२०२४ | दि.०१.०१.२०२३ ते ३१.०३.२०२४ या कालावधीची दि.११.१०.२०२३ रोजी घेण्यत आलेल्य ल.ले. निम्नश्रेणी, यापदाच्या पर्यवेक्षकांचे नियुक्त आदेश, परिक्षा केंद्राचे संचालक यांचे नियुक्ती आदेश, लघुलेखक निम्नश्रेणी परिक्षेस बसलेल्या संपूर्ण उमेदवाराची नांवे, जात, प्रवर्ग, संपूर्ण पत्ता, मो. नंबर परिक्षा घेण्यत आली त्याचे सी.सी.टी.व्ही.फुटेज ज्या अधिकाऱ्याने परीक्षेच्या वेळी भेट दिली त्यांचे फुटेज नियंत्रण अधिकाऱ्याचे नियुक्ती आदेश दि.१०.०२.२०२४ ते दि.१२.०२.२०२४ रोजी शासनास सादर करण्यात आलेला अहवाल साप्रवि व उपमुकाअ साप्रवि यांच्या कार्यालयाचे सी.सी.टी.व्ही. फुटेजची माहिती दि.१५.०१.२०२४, दि.१२.०२.२०२४ दि.१६.०२.२०२४ दि.२६.०३.२०२४ रोजीच्या पत्रावर काय कार्यवाही केली फाईलची टिपणीची छायांकित संपूर्ण माहिती मा.मु.का.अ.जि.प.जालना यांचे जा.क्र.जिपजा/साप्रवि/प्रशा-२/कावि/२०२३/३८६४, दि.१३.१०.२०२३, दि.०७.०८.२०२३ मा.निवासी उपजिल्हा अ.जालना यांचे जा.क्र.२०२३/मशाका/आस्था-१/कावी/३८३ दि.०८.०८.२०२३ मा. जिल्हाधिकारी जालना यांचेकडून दि.०७.०८.२०२३ ते दि.३१.०३.२०२४ पर्यंत सादर करण्यात आलेले पत्रावर काय कार्यवाही केली त्या संपूर्ण फाईलची छायांकित प्रत, आपल्या कार्यालयातील सेवेत कार्यरत वरिष्ठ सहा. विस्तार अ.पंचायत, लघुलेखक उच्चश्रेणी, नि.श्रेणी, लघुटंकलेखक (मंजूर पदे, कार्यरतपदे, रिक्तपदे) बिंदूनामावली रोष्टरसहीत संपूर्ण माहिती. |
| २८.०३.२०२४ | दि.०१.०१.२०१५ ते ३१.०३.२०२४ या कालावधीतील मा.मु.का.अ.जि.प.जालना यांचे जा.क्र.जिपजा/प्रशासन/साप्रवि-२/२०१५/४२७५ दि.१५.०९.२०१५ नुसार मा. विभागीय आयुक्त, विभाग छत्रपती संभाजीनगर यांचेकडे ल.ले. (उच्चश्रेणी) व ल.ले. (निम्नश्रेणी) ही सर सेवेची रिक्त पदे अतिरिक्त ठरलेल्या लघुटंकलेखकांच्या समायोजनेसाठी पदोन्नतीने भरण्यास मान्यता देणेबाबत प्रस्ताव सादर केलेला होता. त्या अहवालाची मान्यतेची प्रत, श्रीम. व्ही.बी.पाठील, लघुटंकलेखक, आरोग्य विभाग, जि.प. जालना यांना जा.क्र.जिपजा/साप्रवि/२/प्रशासन/कावि/२०१६/१०९८ जि.प. जालना दि.१६.०३.२०१६ नुसार सरळसेवेच्या ल.ले.निम्नश्रेणी या पदार पदोन्नती कोणत्या शासन निर्णयात नमूद आहे की, सरळसेवेच्या पदावर पदोन्नती देता येते त्याची संपूर्ण फाईलची छायांकित प्रत व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी दि.२३.०४.२०२४ रोजी माहिती देता येत नाही असे कळविलेले आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती न्यायालयीन कामासाठी आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी तीन्ही माहिती अर्जाद्वारे विस्तृत व्यापक माहिती मागितलेली असल्यामुळे माहिती संकलीत करुन देणे शक्य नाही, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नियम ३ (क) मधील तरतुदीनुसार एकापेक्षा अधिक विषयाची माहिती हवी असेल तर त्याकरिता स्वतंत्र अर्ज करावे, असे अपिलार्थी यांना दि.२३.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या तीन्ही प्रथम अपिलावर दि.२४.०७.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य असल्यामुळे अपिलार्थी यांचे तीन्ही प्रथम अपिले निकाली काढलेले आहे, असा निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व घेतलेला निर्णय योग्य दिसून येत आहे. **प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.** अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात व युक्तिवादात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे तीन्ही द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे तीन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6786 दिनांक: 16/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १४८४/२०२४**
**बोर्ड क्र.०५**

श्री. घनघवे प्रितम पंढरीनाथ, — अपिलार्थी
रा. प्लॉ.नं.६, जुम्बिनी निवास, एकता नगर, जटवाडा रोड,हर्सूल, छत्रपती संभाजीनगर-४३१ ००८.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहायक प्रशासन अधिकारी,
समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना

**(सुनावणी दिनांक ०३.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२१.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी,. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०६.१२.२०२३ | दि.०१.०८.२०१३ ते ३०.११.२०२३ या कालावधीत स्व. राजीव गांधी निवासी मुकबधिर जालना या शाळेतील कर्मचारी वर्षा गुलाबराव देशमुख यांना आपल्या कार्यालयाने ०१ ऑगस्ट २०१३ ते ३१.०८.२०२० या काळात वेतन अदा करण्यात आलेल्या एकूण वेतनाचा तपशील मिळणे तसेच ०१ ऑगस्ट २०१३ ते ३१.०८.२०२० या काळात वर्षा |

| | |
|---|---|
| | गुलाबराव देशमुख यांना वेतन अदा केले नसल्यास वेतन अदा न केल्यचे स्पष्टीकरण मिळणे तसेच ०१ सप्टेंबर २०२० ते ३० नोव्हेंबर २०२३ या काळात त्यांना थकबाकीसहीत एकूण वेतन अदा केले असल्यास एकूण वेतनाचा तपशील व वेतन कशा आधारे अदा करण्यात आले याचे स्पष्टीकरण साक्षांकित सत्यप्रतिसह मिळणेबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१६.०१.२०२४रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती न्यायालयीन कासासाठी आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थांची वैयक्ति माहितीची मागणी केल्यामुळे त्रयस्थांना विचारणा केली असता त्यांनी माहिती देण्यास नकार दिलेला असल्यामुळे देता आलेले नाही. तथापि अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारीयांनी अवगत केले की, प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झालेली नाही. अपिलार्थी यांनी त्रयस्थांची वैयक्तिक माहिती मागितलेली आहे. तथानि जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थांना विहित मुदतीत कळविणे अपेक्षित होते तथापि तसे केल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी **त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक, विस्तृत स्वरुपाची व मोठया कालावधीची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे,** अशी माहिती प्रकट केल्याने त्रयस्थाच्या खाजगी बाबीमध्ये आगंतुक हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशी माहिती अधिनियमातील कलम 8 (1) (त्र) नुसार अपिलार्थीस देय होत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील फेटाळण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत

आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी,समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा.

२. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. अपिलार्थी यांचे द्वितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 6187 दिनांक :- 16/06/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७७८३/२०२४**
**बोर्ड क्र.०६**

श्री. बालासाहेब जनार्दनराव वरखडे, — अपिलार्थी
रा. लक्ष्मीकांतनगर, घर नं.८१, अंबड रोड,
जालना-४३१ २१३.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कनिष्ठ प्रशासन अधिकारी,
महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद, जालना

**(सुनावणी दिनांक ०३.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२९.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १६.११.२०२३ | माहे २०१५ ते २०१९ या कालावधीतील १. श्री. बी.जे. वरखडे विस्तार अधिकारी, सां. यांची संपूर्ण प्रवाही टिप्पणी संचिका साक्षांकित कॉपीसहीत व स्वाक्षरीखाली संबंधीत अधिकारी/ कर्मचारी यांच्या नावाच्या व पदाच्या उल्लेखासहीत.२. मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महितला व बा.क. जि.प. जालना यांची सन २०१५ ते २०१९ कार्यकाळ यादी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जी माझ्यावर कार्यवाही करण्यात आली होती त्याची माहिती मागितलेली होती. तथापि मला दुसरीच दिशाभूल करणारी व चुकीची माहिती दिलेली आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना दि.२९.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, ८७० रुपये लेखाशिर्षमध्ये चलनाद्वारे शासन खाती भरणा करुन माहिती प्राप्त करुन घेण्यात यावे असे कळविले असता, अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. तदनंतर प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार अपिलार्थी यांना दि.२२.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिती पाठविण्यात आलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२९.०४.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती पाठविल्याचे दिसून येत आहे. या ठिकाणी जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय आयोगास योग्य दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार अपिलार्थीस माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांना प्राप्त झालेल्या माहिती बाबत काही तक्रार असल्यास त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागणे उचित होईल. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6188 दिनांक : 16/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०५९९/२०२४**
**बोर्ड क्र.०७**

श्री. बालासाहेब जनार्दनराव वरखडे, — अपिलार्थी
रा. लक्ष्मीकांतनगर, घर नं.८१, अंबड रोड,
जालना-४३१२१३.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहाय्यक प्रशासन अधिकारी (साप्रवी),
जिल्हा परिषद, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवी),
जिल्हा परिषद, जालना

**(सुनावणी दिनांक ०३.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१९.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २६.१०.२०२३ | माहे २०१५ ते २०२३ या कालावधीतील १. श्री.बी.जे. वरखडे, विस्तार अधिकारी (सा.) यांचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद, जालना यांनी काढलेले पहिले निलंबन आदेश ज्याचे क्र.जा. क्र.जिपजा/पं-१/अस्था/सीआर-/५००/२०११/२०१६ जि.प.जालना दि.१७.०५.२०१६ हया आदेशाची जावक रजिष्टरमध्ये नोंद घेतल्याची कॉपी कलर झेरॉक्सच्या साक्षांकित प्रतिसह व इतर चार मुद्याबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध माहिती अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली जन

माहिती अधिकारी यांच्याकडुन माहिती प्राप्त झाली असुन प्राप्त झालेल्या माहितीने समाधान झालेले आहे. त्यामुळे विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचा उपरोक्त युक्तिवाद विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6989 दिनांक : 16/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १४९९ /२०२४**
**बोर्ड क्र.०८**

श्री. बालासाहेब जनार्दनराव वरखडे, अपिलार्थी
रा. लक्ष्मीकांतनगर घर नं.८१, अंबड रोड, जालना-४३१२१३.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
कनिष्ठप्रशासन अधिकारी,
पंचायत विभाग, जिल्हा परिषद, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद, जालना

**(सुनावणी दिनांक ०३.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२२.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १५.१२.२०२३ | श्री. बी.जे. वरखडे यांनी आपल्या कार्यालयास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(१) प्रमाणे दि.२५.१०.२०२३ रोजी केलेले प्रथम अपिल व त्या अनुषंगाने श्री. बी.जे. वरखडे यांनी आपल्या कार्यालयास दि.०१.११.२०२३ रोजी दिलेले अंतिम स्मरणपत्र यानुसार आपल्या कार्यालयाने केलेली कार्यवाही व इतर तीन मुद्याची माहिती.. |

प्रस्तुत प्रकरणात, आयागापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१५.०१.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती

अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, सरळ सेवा भरती प्रक्रियेमुळे कामाचा जास्तीचा व्याप असल्यामुळे माहिती देता आलेली नाही. आपल्या आदेशाप्रमाणे अपिलार्थीस माहिती देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे व सुनावणी न घेतल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात व युक्तिवादात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र. 6190 दिनांक : 16/06/2025

प्रत :- आवश्यकत्या कार्यवाहीकरिता,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २०३५/२०२४**
अपिलार्थी यांनी दि.०५.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.०३.२०४ | दि.०१.०१.२०१५ ते आजर्यंत या कालावधीतील आपल्या कार्यालयातील अधिकारी श्री. ओंकार बोडखे यांच्याशी संबंधीत शासकीय माहिती मिळणेबाबत, म्हणजे, कोणत पदावर व केंव्हापासून कार्यरत होते, चार्ज देण्यात आले त्या आदेशाची प्रत, कोणत्या कामासाठी आदेश देण्यात आले व इतर |
| ०४.०३.२०२४ | दि.०१.०१.२०२२ ते आजपर्यंत या कालावधीतील जन जीवन मिशन योजना मौजे शेवगा ता. जि. जालना योजनेची संपूर्ण माहिती मिळणे, प्रशासकीय व तांत्रीक मान्यता, निविदेचे ऑनलाईन संच, कंत्राटदारांनी निविदा भरली त्यांच्या कंपनीचे नाव, पत्ता व संपर्क क्रमांक व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या दोन्ही माहिती, अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांना माहिती पोस्टाने पाठविलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मला कसलाही प्रतिसाद मिळालेला नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवाद केल्याप्रमाणे पुरावा आयोगाच्या पटलावर सादर केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. **प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि०७.०६.२०२४ रोजी दिलेला आदेश कायम करण्यात येत आहे.** या आदेशात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे दोन व्दितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6198 दिनांक : 16/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८९६१/२०२४**
**बोर्ड क्र.२२**

श्री. ज्ञानदेव दत्तात्रय काकडे, — अपिलार्थी
मु. पो. जयपूर, ता. मंठा, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वैद्यकीय अधिकारी,
प्राथमिक आरोग्य केंद्र दहीफळ खंदारे, ता. मंठा, जि. जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना

**(सुनावणी दिनांक ०३.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०९.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. (जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उशिराने उपस्थित )

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.०६.२०२४ | दि.०१.१०.२०१८ ते २५.०६.२०२४ या कालावधीतील आपल्या कार्यालयास शासनाकडून प्राप्त झालेले मेडीसीन लस, उपकरणे, साहित्य, फर्नीचर याची माहिती मिळणेबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती दिलेली नाही तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन आदेश पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना पोस्टाने दि.२६.०७.२०२४ रोजी माहिती पाठविलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्या प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी (उशिराने उपस्थित आहेत) यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणतीही माहिती मिळाला नाही व अपील सुनावणी झाली आदेश मिळाला नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना परिपुर्ण माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांचा युक्तिवाद व त्यांनी द्वितीय अपिल नमूद केलेल्या प्रयाजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत:, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र दहीफळ खंदारे, ता. मंठा, जि. जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र दहीफळ खंदारे, ता. मंठा, जि. जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही.

त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6161 दिनांक : 16/06/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना.

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १७८२/२०२४**
**बोर्ड क्र.२३**

श्री. रमेश शशिकांत सोनवणे,
रा. ताडहादगाव, ता. अंबड, जि. जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उपअभियंता,
ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, अंबड, जि. जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जालना

**(सुनावणी दिनांक ०३.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१७.०३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १५.०१.२०२४ | जि.प.ग्रा.पा. पुरवठा उपविभाग अंबड या कार्यालयाकडून ताडहादगाव येथे चालू असलेल्या ९९३६७४७ लाख रुपयाच्या जल नवीन मिशन कामाची माहिती मिळणेबाब. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०५.०३.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. त्याच दिवशी अपिलार्थी यांना त्यांच्या आदेशाप्रमाणे माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन पोहच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपुर्ण

माहिती देण्यात आल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती अपुर्ण मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, **प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन पोहच दिलेली आहे.** अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. अपिलार्थी यांना मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने काही तक्रार असल्यास अपिलार्थी यांनी संबंधीत सक्षमप्राधिकरणाकडे दाद मागणे उचित होईल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6499 दिनांक : 16/06/2025

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५९९५/२०२४**
**बोर्ड क्र.२४**

श्री. ताहेर अमद चाऊस, — अपिलार्थी
रा. पोलीस स्टेशन समोर, टेंभूर्णी, ता. जाफ्राबाद, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जालना

**(सुनावणी दिनांक ०३.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३१.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.०४.२०२४ | मा. केशव नेटके निवासी उपजिल्हाधिकारी जालना यांचे कार्यालयीन पत्र जा.क्र.२०२३/मशाका/पाणी टंचाई/कावि-३५९दिनांक २८.०९.२०२३ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने आपण अर्जात नमूद केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने आपण कोणती चौकशी केली आहे व चौकशी करुन आपण आपल्या कार्यवाहीचा अहवाल आपले स्वयंस्पष्ट आपल्या वरिष्ठांना किंवा निवासी उपजिल्हाधिकारी जालना यांना पाठविला आहे त्याची माहिती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी अद्यापर्यंत माहिती दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, विभागीय चौकशी सुरु असल्यामुळे माहिती देण्यात आलेली नाही. अपिलार्थी यांनी तक्रार केले की काम थांबवलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, निर्णय आदेश देवून पण माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येत की, अपिलार्थी यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेशीत केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दयावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6200 दिनांक : 16/06/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५७०२/२०२४**
**बोर्ड क्र.२५**

श्री. सुयोग अंबादासराव खर्डेकर, — अपिलार्थी
रा. जे ई एस कॉलेज रोड, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
शिक्षण विभाग (प्राथमिक),
जिल्हा परिषद, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, जालना

**(सुनावणी दिनांक ०३.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०८.०१.२०२४ | शिक्षक व कर्मचारी यांच्या वैयक्तिक मान्यतेबाबत त्यांचे नाव शाळेचे नाव परिवेक्षा कालावधी सेवा सातत्य कालावधी जावक क्रमांक व दिनांकासह तपशील देण्यात यावा. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने त्यांना दि.११.०१.२०२४ रोजीच्यापत्रान्वये, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) (त्र) नुसार माहिती देता येत नाही, असे कळविलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, माझ्याकडे दोन कार्यासनांकडील कामकाजाचे व्यापक स्वरुप असल्याने तसेच सदर माहिती अधिकार अधिनियम२००५ चे नियम १९(१) अन्वये प्राप्त होणारे प्रथम अपील अर्ज तत्कालीन संबंधीतांनी माझ्या निदर्शनास न आल्याने

वेळेत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने सविस्तरपणे कळविल्याचे दिसून येत आहे. **अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक विस्तृत व व्यापक स्वरुपाची संकलीत करुन माहितीची मागणी केलेली आहे.** माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २ (च) मध्ये माहितीची व्याख्या दिलेली आहे. या व्याख्येनुसार माहिती तयार करुन, माहितीचे संस्करण करुन, इतर कार्यालयाकडुन प्राप्त करुन घेऊन, लेखी, खुलासे वजा, स्पष्टीकरण मागणारी इ. माहिती देणे अभिप्रेत नाही. अपिलार्थीचा अर्ज ज्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त होतो, त्यावेळी जी माहिती त्यांच्या कार्यालयात ज्या स्थितीत उपलब्ध असते, ती माहिती त्याच स्थितीत अपिलार्थीस देय होते.जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6204 दिनांक :- 16/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २४६६/२०२४**
**बोर्ड क्र.२६**

श्री. राजेंद्र सर्जेराव सिनगारे, — अपिलार्थी
मु. पो. कंडारी बु., ता. बदनापूर, जि. जालना-४३१२०२

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
मुख्याध्यापक, श्री संत तुकाराम विद्यालय, कंडारी बु.,
ता. बदनापूर, जि. जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
शिक्षणाधिकारी, माध्यमिक, जिल्हा परिषद, जालना

**(सुनावणी दिनांक ०३.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२८.०३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०१.०१.२०२४ | १. सन २०२२-२०२३ मधील विद्यालयातील पट संख्येची विस्तीर्ण माहिती (संच मान्यता)<br>२. सन १९९३ पासून २०२३ पर्यंत विद्यालयास मिळालेले इतर शैक्षणिक अनुदान (Non teaching fund) ची सविस्तर माहिती |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रांवरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०६.०२.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अर्धवट व चुकिची दिलेली आहे. माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी शुल्क सुध्दा भरलेला आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, चुकिची माहिती दिलेली आहे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती अर्धवट

मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी शुल्काचा भरुन ही अपिलार्थी यांना परिपुर्ण माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीची आयोगाने गंभीर दखल घेतलेली आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे. अपिलार्थी यांना देय होणारी माहिती आयोगाचे आदेशप्राप्त होताच ३० दिवसात विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात यावे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री संत तुकाराम विद्यालय, कंडारी बु., ता. बदनापूर, जि. जालना यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री संत तुकाराम विद्यालय, कंडारी बु., ता. बदनापूर, जि. जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. शिक्षणाधिकारी, माध्यमिक, जिल्हा परिषद, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 6202 दिनांक : 16/06/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८३४३/२०२४**
**बोर्ड क्र.२७**

श्री. विजयकुमार दादाराव खरात, — अपिलार्थी
रा. प्लॉट नं.६२, समर्थ नगर, घाटी रोड, जालना-४३१२०३

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०३.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ऑनलाईन | १. जालना जिल्हयातील किती व कोणत्या स्वय अर्थसहाय शाळांना त्यांची शाळा २. शिफ्ट मध्ये चालवण्याची परवानगी/ ना हारकत आपल्या कार्यालयाने दिली आहे. सदर माहिती पुराव्यानिशी, शाळांना दिलेले पत्र, माहितीच्या अधिकाराखाली देण्यात यावी.<br>२. सन २०१२-१३ हया शैक्षणिक वर्षापासून ते आज सन २०२२-२३ हया शैक्षणिक वर्षापर्यत आर टी ई अंतर्गत स्वयं अर्थसाहाय्यीत इंग्रजी माध्यातील सी बी एस ई संलग्न शाळामध्ये किती आर टी ई विद्यार्थ्यांना .. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहितीच्या अनुषंगाने विस्तृत माहिती आहे एक एम बी उपलब्ध आहे असे कळविलेले आहे. माहिती अर्जान्वये

मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने पहिल्या विषयाची माहिती देता येत नाही असे असे दि.०९.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये व ऑनलाईन कळविण्यात आलेले आहे. तसेच मुद्दा क्र.२ ची माहिती आता देण्यात येईल असे आयोगासमक्ष अश्वासीत केलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.११.०७.२०१४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य ठरवून अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, हवी असलेली माहिती प्राप्त झालेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अर्धवट माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान देय होणारी माहिती दिलेली आहे. उर्वरीत माहिती करिता कलम २ (च) मध्ये मोडत असल्याने देता येत नाही असे कळविलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय आयोगास योग्य दिसून दिसून येत आहे. यास्तव अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयाजनात व युक्तिवादात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 6203 दिनांक :- 16/06/2025

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ८२७/२०२४
बोर्ड क्र.२८

श्री. मोजस जोसेफ श्रीसुंदर, — अपिलार्थी
रा. प्लॉट नंबर १२०, सरस्वती कॉलनी रेल्वेस्टेशन जवळ,
जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
शिक्षण विभाग (माध्यमिक),
जिल्हा परिषद, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, जालना

**(सुनावणी दिनांक ०३.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२५.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३०.१०.२०२३ | पोलीस ठाणे सदर बाजार जालना जावक क्रमांक १६१७/२०२३ दिनांक १९.०५.२०२३ याबाबत चौकशी होऊन स्वंयस्पष्ट अहवाल प्रमाणित करुन देणेबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.११.१२.२०२३ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली

माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना परिपुर्ण माहिती देण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा शिक्षण विभाग (माध्यमिक),जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा शिक्षण विभाग (माध्यमिक),जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, जालना यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, जालना यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6204 दिनांक : 16/06/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, जालना

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५३३५/२०२४**
**बोर्ड क्र.२९**

श्री. विजयकुमार भिवसनराव लहाने, — अपिलार्थी
रा. पुषकुंज, अण्णाभाऊ साठे नगर, जाफ्राबाद,
ता. जाफ्राबाद, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
मुख्याध्यापक,
शिवाजी विद्यालय, भारज बु, ता. जाफ्राबाद, जि. जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिष्द, जालना

**(सुनावणी दिनांक ०३.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२०.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०६.०२.०२४ | ऑगस्ट १९८७ ते डिसेंबर २०२३ या कालावधीतील १. शाळेत कार्यरत असणाऱ्या |

| | |
|---|---|
| | कर्मचाऱ्यांना संस्थेने दिलेल्या परीविक्षाविधीन व कायम नेमणूक आदेशाच्या साक्षांकित प्रती २. शाळेत कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना शिक्षणाधिकाऱ्यांनी दिलेल्या परीविक्षाविधीन व कायम नेमणूक आदेशाच्या साक्षांकित प्रती ३. शाळेत कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची नेमणूक ज्या दिनांकास झाली त्या महिन्यातील त्या कर्मचाऱ्यांच्या हजेरी पत्रकाच्या साक्षांकित प्रती ४. शाळेत कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची नेमणूक ज्या शैक्षणिक पात्रतेवर करण्यात आली त्या शैक्षणिक प्रमाणपत्राच्या एस एस सी व एच एस सी गुणपत्रक, पदवी गुणपत्रक, व्यवसायीक पदवी किंवा पदवीका गुणपत्रक, जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२०.०३.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मागितलेली माहिती विहित कालावधीत प्राप्त न होणे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांचा युक्तिवाद व अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय, भारज बु, ता. जाफ्राबाद, जि. जालना यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय, भारज बु, ता. जाफ्राबाद, जि. जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निदेशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र.श्या.इं.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र.- 6205 दिनांक :- 16/06/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५९८६/२०२४**
**बोर्ड क्र.३०**

| | |
|---|---|
| श्री. प्रविण सुभाष पिपळे,<br>रा. सोनगिरी, पो, वरुड बु., ता. जाफ्राबाद, जि. जालना | अपिलार्थी |
| **विरुध्द** | |
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, जालना | : उत्तरवादी क्र.१ |
| २ प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, जालना | : उत्तरवादी क्र.२ |

**(सुनावणी दिनांक ०३.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३१.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०५.०२.२०२४ | शिक्षकाच्या नियमबाहय केलेल्या प्रतिनियुक्ती बाबत नारायण रमेशराव लोखंडे यांनी सादर केलेल्या निवेदन अर्जाच्या अनुषंगाने दि.०१.०१.२०२४ या पत्रान्वये आपल्या कार्यालयाकडून करण्यात आलेल्या प्रशासकीय कार्यवाहीच्या साक्षांकित प्रती मिळाव्यात. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०५.०३.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी

त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक स्वरुपाची माहिती मागितली असल्यामुळे अपिलार्थी यांना दिलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मुदतीत प्रतिसाद न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. यास्तव अपिलार्थी यांनी व्दितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केली माहिती जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसात देण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदींनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र.----6206---------- दिनांक :- 16/06/2025---

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०२१४/२०२४**
**बोर्ड क्र.३१**

श्री. कृष्णा सुमंथन तांबे, — अपिलार्थी
द्वारा- गजानन गडिकर लोकमान्य शाळेसमोर, घायाळनगर,
जुना जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वेतन अधिक्षक शिक्षण विभाग,
माध्यमिक, भविष्य निर्वाह निधी पथक, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना

**(सुनावणी दिनांक ०३.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१४.११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०८.२०२४ | सन २०१८ पासून जालना जिल्हयात शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यतेच्या प्रति साक्षांकित करुन देण्याबाबत. २. शालार्थ आय डी मान्यता देण्यात आलेल्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या साक्षांकित प्रती देण्याबाबत ३. सन २०१८ पासून शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे वेतन सुरु आहे यांची संख्या देण्याबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२६.०९.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वेतन अधिक्षक शिक्षण विभाग, माध्यमिक, भविष्य निर्वाह निधी पथक, जालना यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

| ४४ | ४५५४/२०२४ | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, भाकरवाडी, ता. बदनापूर, जि. जालना | विस्तार अधिकारी, पंचायत समिती, बदनापूर, जि. जालना |
| ४५ | ४५५५/२०२४ | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, हालवोला, ता. बदनापूर, जि. जालना | विस्तार अधिकारी, पंचायत,पंचायत समिती, बदनापूर, जि. जालना |
| ४६ | ४५५६/२०२४ | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, विल्हाडी, ता. बदनापूर, जि. जालना | विस्तार अधिकारी, पंचायत,पंचायत समिती, बदनापूर, जि. जालना |
| ४७ | ४५५७/२०२४ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कारला, ता. जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कारला, ता. जि. जालना |
| ४८ | ४९६३/२०२४ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुतार पिंपळगाव, ता. भोकरदन, जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुतार पिंपळगाव, ता. भोकरदन, जि. जालना |
| ४९ | ४९६४/२०२४ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, उटवद, ता.जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, उटवद, ता.जि. जालना |
| ५० | ४९६५/२०२४ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पारध, ता. भोकरदन, जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पारध, ता. भोकरदन, जि. जालना |

| | | | |
|---|---|---|---|
| ५१ | ४९६६/२०२४ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वालसावंगी, ता. भोकरदन, जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वालसावंगी, ता. भोकरदन, जि. जालना |
| ५२ | ४९६७/२०२४ | लघु पाटबंधारे विभाग, जालना | कार्यकारी अधिकारी, लघु पाटबंधारे विभाग, जालना |
| ५३ | ४९६८/२०२४ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राजूर, ता. भोकरदन, जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राजूर, ता. भोकरदन, जि. जालना |
| ५४ | ६४४३/२०२४ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंदापूर, ता.जि.जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चंदापूर, ता. जि. जालना |
| ५५ | ६४४४/२०२४ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अहंकार देऊळगांव, ता. जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अहंकार देऊळगांव, ता.जि. जालना |
| ५६ | ६४४५/२०२४ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गवळीपोखरी, ता.जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद, प्राथमिक शाळा गवळीपोखरी, ता.जि. जालना |
| ५७ | ६४४६/२०२४ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कल्याणप्रकल्प, ता.जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कल्याणप्रकल्प, ता.जि. जालना |
| ५८ | ६४४७/२०२४ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पोकळवडगाव, ता.जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पोकळवडगाव, ता.जि. जालना |
| ५९ | ६४४८/२०२४ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिरकल्याण, ता.जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिरकल्याण ता.जि. जालना |
| ६० | ८०५४/२०२४ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोनाडेवाडी, ता. भोकरदन, जि. जालना | मुख्याध्यापक,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोनाडेवाडी, ता. भोकरदन, जि. जालना |
| ६१ | ८०५५/२०२४ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिवेश्वरवाडी, ता. भोकरदन, जि. जालना | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिवेश्वरवाडी, ता. भोकरदन, जि. जालना |
| ६२ | ८६२१/२०२४ | वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र माहोरा, ता. जाफ्राबाद, जि. जालना | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जालना |
| ६३ | ८६२४/२०२४ | वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र टेंभुर्णी, ता. जाफ्राबाद, जि. जालना | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जालना |
| ६४ | ८६२५/२०२४ | वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र खासगांव, ता. जाफ्राबाद, जि. जालना | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जालना |
| ६५ | ८६२६/२०२४ | वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र खासगांव, ता. जाफ्राबाद, जि. | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जालना |

| | | | |
|---|---|---|---|
| | | जालना | |
| ६६ | ८६२७/२०२४ | वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र भारज बु, ता. जाफ्राबाद, जि. जालना | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जालना |
| ६७ | ८७८४/२०२४ | उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, जालना | कार्यकारी अभियंता, (बांधकाम) जिल्हा परिषद, जालना |
| ६८ | ८७८६/२०२४ | उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, जालना | कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद, जालना |
| ६९ | ८७८७/२०२४ | उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, जालना | कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद, जालन |
| ७० | ८७८९/२०२४ | उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, जालना | कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद, जालना |
| ७१ | ७८६५/२०२४ | उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, जाफ्राबाद, जि. जालना | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना |
| ७२ | ७८६६/२०२४ | उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घनसावंगी, जि. जालना | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना |
| ७३ | ७८६७/२०२४ | उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मंठा, जि. जालना | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना |
| ७४ | ७८६८/२०२४ | उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, परतूर, जि. जालना | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना |
| ७५ | ७८६९/२०२४ | उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, भोकरदन, जि. जालना | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना |
| ७६ | ९५३७/२०२४ | राम रहिम विद्यालय सिपोरा बाजार, ता. भोकरदन, जि. जालना | मुख्याध्यापक, राम रहिम विद्यालय सिपोरा बाजार, ता. भोकरदन, जि. जालना |

**(सुनावणी दिनांक ०३.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी वेगवेळया तारखेला राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये ३६ इतकी द्वितीय अपिले दाखल केलेली आहेत. सर्व प्रकरणाच्या अनुषंगाने व्दितीय अपिलांची एकत्रित सुनावणी दि.०३.०६.२०२५ रोजी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आला होता. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी सुनावणी दरम्यान उपलब्ध करुन देण्यात आली होती. तसेच अपिलार्थी यांना भ्रमणध्वनीद्वारे कळविण्यात आले आहे. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी बहुतांश जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार वेगवेगळया जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|---|
| ४१ | ०८६४/२०२४ | ३०.१०.२०२३ | दि.१ जुलै २०२१ ते आजपर्यंत आपल्या कार्यालयात कार्यरत असलेले मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी रहात असलेल्या ठिकाणाचे भाडेकरार पावती व तसेच सदरील ठिकाणी रहात असलेल्या ग्रामपंचायतीचा ठरावाच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात. |
| ४२ | ०८६५/२०२४ | ०४.११.२०२३ | दि.१७ जुलै २०२० ते आजपर्यंत मुख्यालयी वास्तव्य करुन रहात असलेल्या श्री. व्ही.टी. लहाणे (प्र.मु.अ.)श्री. एस.बी. टापरे, एस दळवी, यु. एस. तायडे, शि., यांची घरभाडे पावती तसेच सदरील ठिकाणाच्या ग्रामपंचायत नगर पंचायत ग्रामसंसद यापैकी ठरावाचे झेरॉक्स प्रती १० दिवसात तात्काळ देण्यात यावी. |
| ४३ | ४५५३/२०२४ | २८.१२.२०२३ | दि.०१ जून २०२० ते आजपर्यंत आपल्या शाळेत असलेले मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षीका व शिक्षीकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत असलेल्या ठिकाणचे भाडेकरार पावती व सदरील ग्रामपचंायत किंवा नगरपंचायतचा ठराव इत्यादी माहिती देण्यात यावी. |
| ४४ | ४५५४/२०२४ | २३.११.२०२३ | दि.०१ जानेवारी २०२२ ते आजपर्यंत आपल्या कार्यालयामार्फत राबविण्यात आलेल्या १५ वा वित्त आयोगाअंतर्गत एकूण प्राप्त निधी त्याअनुषंगाने कृती अराखडयासह करण्यात आलेल्या (कामाचे स्वरुप) शासन जमा केलेले चलनाची झेरॉक्स प्रत देण्यात यावी त्यानुसार १ रॉयल्टी, २ विमा, ३ जी एस टी., ४ इन्शुरंन्स भरणा पावत्यांची झेरॉक्स प्रत देण्यात यावी |
| ४५ | ४५५५/२०२४ | २३.११.२०२३ | दि.०१ जानेवारी २०२२ ते आजपर्यंत या कालावधीतील आपल्या मार्फत राबविण्यात आलेल्या ५ वा वित्तआयोगा अंतर्गत एकूण प्राप्त निधी त्या अनुषंगाने कृती अराखडयासह करण्यात आलेल्या (कामाचे स्वरुप) शासन जमा केलेले चलनाची झेरॉक्स प्रत देण्यात यावी त्यानुसार १ रॉयल्टी, २. विमा, ३. जी एस टी., ४. इन्शरंन्स भरणा पावत्यांची झेरॉक्स प्रत देण्यात यावी. |
| ४६ | ४५५६/२०२४ | २३.११.२०२३ | ०१ जानेवारी २०२२ ते आजपर्यंत आपल्या कार्यालया मार्फत राबविण्यात आलेल्या १५ वा वित्त अयोगा अंतर्गत एकूण प्राप्त निधी त्या अनुषंगाने कृती अराखडयासह करण्यत आलेल्या (कामाचे स्वरुप) शासन जमा केलेले चलनाची झेरॉक्स प्रत देण्यात यावी त्यानुसार १. रॉयल्टी २. विमा, ३. जी.एस.टी.,४. इन्शुरंन्स भरणा पावत्यांची झेरॉक्स प्रत देण्यात यावी. |

| | | | |
|---|---|---|---|
| ४७ | ४५५७/२०२४ | २३.०१.२०२४ | दि.०१ जून २०२० ते आजपर्यंत आपल्या शाळेत कार्यरत असलेले मुख्यायापक, शिक्षक, शिक्षीका व शिक्षीकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत असलेल्या ठिकाणाचे भाडेकरार पावती व सदरील ग्रामपंचायत किंवा नगरपचायतचा ठराव इत्यादी माहिती देण्यात यावी. |
| ४८ | ४९६३/२०२४ | ०२.०२.२०२४ | दि.०१ जून २०१० ते आजपर्यंत आपल्या शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक, शिक्षक शिक्षीका व शिक्षीकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत असलेल्या ठिकाणाचे भाडेकरार पावती व सदरील ग्रामपंचायत किंवा नगरपंचायतचा ठराव इत्यादी माहिती देण्यात यावी. |
| ४९ | ४९६४/२०२४ | ०२.१२.२०२३ | दि.०१ जून २०२० ते आजपर्यंत आपल्या शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षीका व शिक्षीकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत असलेल्या ठिकाणची भाडेकरार पावती व सदरील ग्रामपंचायत किंवा नगरपंचायतचा ठराव इत्यादी माहिती देण्यात यावी. |
| ५० | ४९६५/२०२४ | ०७.०२.२०२४ | दि.०१ जून २०२० ते आजपर्यंत आपल्या शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षीका व शिक्षीकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत असलेल्या ठिकाणची भाडेकरार पावती व सदरील ग्रामपंचायत किंवा नगरपंचायतचा ठराव इत्यादी माहिती देण्यात यावी. माहिती तयार झाल्यावर भ्रमणध्वनीद्वारे कळवावी. |
| ५१ | ४९६६/२०२४ | ०२.०२.२०२४ | दि.०१ जून २०२० ते आजपर्यंत आपल्या शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षीका व शिक्षीकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत असलेल्या ठिकाणचे भाडेकरार पावती व सदरील ग्रामपंचायत किंवा नगर पंचायतचा ठराव इत्यादी माहिती देण्यात यावी. |
| ५२ | ४९६७/२०२४ | ०२.०२.२०२४ | दि.०१ जानेवारी २०२० ते आजपर्यंत आपल्या विभागाअंतर्गत राबविण्यात आलेल्या विकास कामाच्या अनुरांगाने पाट दुरुस्ती बंधारा दुरुस्ती पुलाचे चरचे तसेच इतर नविन व जुने इत्यादी कामाची खर्चासह गट नं. गावनिहाय ठिकाणासह यादी देण्यात यावी. |
| ५३ | ४९६८/२०२४ | ०२.०२.२०२४ | दि.१ जुन २०२० ते आजपर्यंत आपल्या शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षीका व शिक्षीकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत असलेल्या ठिकाणाची भाडेकरार पावती व सदरील ग्रामपंचायत किंवा नगरपंचायतचा ठराव इत्यादी माहिती देण्यात यावी. |
| ५४ | ६४४३/२०२४ | ३०.०३.२०२४ | दि.१ जुन २०२० ते आजपर्यंत आपल्या शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षीका व शिक्षीकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत असलेल्या ठिकाणाची |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | भाडेकरार पावती व सदरील ग्रामपंचायत किंवा नगरपंचायतचा ठराव इत्यादी माहिती देण्यात यावी. |
| ५५ | ६४४४/२०२४ | ३०.०३.२०२४ | दि.१ जुन २०२० ते आजपर्यंत आपल्या शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षीका व शिक्षीकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत असलेल्या ठिकाणाची भाडेकरार पावती व सदरील ग्रामपंचायत किंवा नगरपंचायतचा ठराव इत्यादी माहिती देण्यात यावी. |
| ५६ | ६४४५/२०२४ | ३०.०३.२०२४ | दि.१ जुन २०२० ते आजपर्यंत आपल्या शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षीका व शिक्षीकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत असलेल्या ठिकाणाची भाडेकरार पावती व सदरील ग्रामपंचायत किंवा नगरपंचायतचा ठराव इत्यादी माहिती देण्यात यावी. |
| ५७ | ६४४६/२०२४ | ३०.०३.२०२४ | दि.१ जुन २०२० ते आजपर्यंत आपल्या शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षीका व शिक्षीकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत असलेल्या ठिकाणाची भाडेकरार पावती व सदरील ग्रामपंचायत किंवा नगरपंचायतचा ठराव इत्यादी माहिती देण्यात यावी. |
| ५८ | ६४४७/२०२४ | १८.०३.२०२४ | दि.१ जुन २०२० ते आजपर्यंत आपल्या शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षीका व शिक्षीकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत असलेल्या ठिकाणाची भाडेकरार पावती व सदरील ग्रामपंचायत किंवा नगरपंचायतचा ठराव इत्यादी माहिती देण्यात यावी. |
| ५९ | ६४४८/२०२४ | ३०.०३.२०२४ | दि.०१ जून २०२० ते आजपर्यंत आपल्या शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षीका शिक्षीकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत असलेल्या ठिकाकणाचे भाडेकरार पावती व सदरील ग्रामपंचायत किंवा नगरपंचायतचा ठराव इत्यादी माहिती देण्यात यावी. |
| ६० | ८०५४/२०२४ | १२.०४.२०२४ | दि.०१ जून २०२० ते आजपर्यंत आपल्या शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षीका व शिक्षीकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत असलेल्या ठिकाणाची भाडेकरार पावती व सदरील ग्रामपंचायत किंवा नगरपंचायतचा ठराव इत्यादी माहिती देण्यात यावी. |
| ६१ | ८०५५/२०२४ | १२.०४.२०२४ | दि.०१ जून २०२० ते आजपर्यंत आपल्या शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षीका व शिक्षीकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत असलेल्या ठिकाणची भाडेकरार पावती व सदरील ग्रामपंचायत किंवा नगरपंचायतचा ठराव इत्यादी माहिती देण्यात यावी. |
| ६२ | ८६२१/२०२४ | १०.०६.२०२४ | दि.०१ जानेवारी २०२१ ते आजपर्यंत आपल्या प्रा.आ. केंद्राअंतर्गत कार्यरत असलेल्या डॉक्टर आरोग्य सेवक, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | आरोग्य सेविका व इतर कार्यरत असलेले कर्मचारी यांच्या मुख्यालयी रहात असलेल्या ठिकाणाचे भाडे करार पावत्या व सदरील ग्रामपंचायतीचा ठराव इत्यादी माहिती देण्यात यावी. |
| ६३ | ८६२४/२०२४ | १०.०६.२०२४ | दि.०१ जानेवारी २०२१ ते आपर्यंत आपल्या कार्यालया अंतर्गत कार्यरत असलेल्या डॉक्टर, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका व इतर कार्यरत कर्मचारी रहात असलेल्या ठिकाणाचे भाडेकरार पावत्या व सदरील ठिकाणाचे ग्रासंसद /ग्रामपंचायतीचा ठराव इत्यादीच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात. |
| ६४ | ८६२५/२०२४ | १०.०६.२०२४ | दि.०१ जानेवारी २०२१ ते आजपर्यंत आपल्या कार्यालया अंतर्गत कार्यरत असलेले डॉक्टर, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका व इतर कार्यरत असलेल्या कर्मचारी मुख्यालयी रहात असलेले भाडेकरार पावत्या व सदरील ठिकाणाच्या ग्रामपंचायतीचा ठरावासह झेरॉक्स प्रतीत माहिती देण्यात यावी. |
| ६५ | ८६२६/२०२४ | १०.०६.२०२३ | दि.०१ जानेवारी २०२१ ते आजपर्यंत आपल्या कार्यालया अंतर्गत कार्यरत असलेले डॉक्टर, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका व इतर कार्यरत कर्मचारी रहात असलेल्या ठिकाणाचे भाडेकरार पावत्या व सदरील ठिकाणाच्या ग्रामपंचायतीचा ठरावासह झेरॉक्स प्रतीत माहिती देण्यात यावी. |
| ६६ | ८६२७/२०२४ | १०.०६.२०२४ | दि.०१ जानेवारी २०२१ ते आजपर्यंत आपल्या प्रा.आ. केंद्राअंतर्गत कार्यरत असलेल्या डॉक्टर, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका व इतर कार्यरत असलेल्या ठिकाणासह मुख्यालयी रहात असलेल्या ठिकाणाचे भाडेकरार पावत्या व सदरील ठिकाणाच्या ग्रामपंचायतीचा ठरावासह झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात. |
| ६७ | ८७८४/२०२४ | ०६.०५.२०२४ | दि.०१ जानेवारी २०२४ ते आजपर्यंत आपल्या उपविभागा अंतर्गत लोकसभा निवडणुक मतदान केंद्र दुरुस्ती व विज, पाणी, निवारा, वर्ग खोली दुरुस्ती दिव्यांगासाठी रॅम्प इत्यादी माहिती गावनिहाय खर्चाचा तपशिलवार माहिती देण्यात यावी. |
| ६८ | ८७८६/२०२४ | ०३.०५.२०२४ | दि.०१ जानेवारी २०२३ ते आजपर्यंत आपल्या उप विभागाअंतर्गत करण्यात आलेल्या रस्ते डांबरीकरण, खडीकरण, नवीन पुल, जुने पुल दुरुस्ती, नाली बांधकाम साईज पंखे व इतर कामाची गाव निहाय, रस्तेनिहाय खर्चासह यादी देण्यात यावी. |
| ६९ | ८७८७/२०२४ | ०३.०५.२०२४ | दि.०१ जानेवारी २०२३ ते आजपर्यंत आपल्या उपविभागात एकूण माहिती अधिकार व विविध विकास कामाच्या संदर्भात केलेल्या प्राप्त तक्रारी व त्या अनुषंगाने त्यांना देण्यात आलेली लेखी उत्तराच्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात. |
| ७० | ८७८९/२०२४ | २७.०५.२०२४ | सन २०२३-२४ दरम्यान आपल्या कार्यालयात कार्यरत असलेले शाखा अभियंता श्री. आर.पी. बालूरकर यांच्या अधिपत्याखाली विविध योजना अंतर्गत केलेल्या कामाची पुर्ण व अंतीम केलेल्या कामाचे स्वरुपासह ठिकाण व गावनिहाय खर्चासह यादी देण्यात यावी. |
| ७१ | ७८६५/२०२४ | १२.०४.२०२४ | दि.०१ जानेवारी २०२३ ते आजपर्यंत आपल्या उपविभागामार्फत करण्यात आलेल्या नवीन रस्ता, जुना रस्ता, दुरुस्ती, नवीन पुल, जुना पुल, दुरुस्ती खड्डे बुजविणे, साईड पंखे करणे, इत्यादी कामाची रस्तेनिहाय खर्चासह यादी देण्यात यावी. |
| ७२ | ७८६६/२०२४ | १२.०४.२०२४ | दि.०१ जानेवारी २०२३ ते आजपर्यंत आपल्या कार्यालयाअंतर्गत करण्यात आलेल्या नवीन रस्ता, जुना रस्ता, दुरुस्ती,नवीन पुल, जुने पुल, दुरुस्ती व ओ.डी.आर., व्ही. डी.आर. इत्यादी कामाची रस्ते निहाय खर्चासह यादी देण्यात यावी. |
| ७३ | ७८६७/२०२४ | १२.०४.२०२४ | दि.०१ जानेवारी २०२३ ते आजपर्यंत आपल्या उपविभागा अंतर्गत राबविण्यात आलेल्या जुनारस्ता दुरुस्ती, नवीन रस्ता, जुने पुल, दुरुस्ती, नवीन पुल, साईड पंखे खड्डे बुजविणे इत्यादी कामाची रस्ते निहाय खर्चासह यादी देण्यात यावी. |
| ७४ | ७८६८/२०२४ | १२.०४.२०२४ | दि.०१ जानेवारी २०२३ ते आजपर्यंत करण्यात आलेलया नवीन रस्ता, जुना रस्ता दुरुस्ती नवीन पुल, जुना पुल दुरुस्ती खड्डे भरणे, साईड पंखे इत्यादी कामाची खर्चासह यादी देण्यात यावी. |
| ७५ | ७८६९/२०२४ | १२.०४.२०२४ | दि.०१ जानेवारी २०२३ ते आजपर्यंत आपल्या कार्यालया अंतर्गत करण्यात आलेल्या नवीन रस्ता, जुना रस्ता, जुना पुल, दुरुस्ती, नवीन पुल व साईड पंखे भरणे, खड्डे बुजवणे इत्यादी कामाची खर्चासह यादी देण्यात यावी. |
| ७६ | ९५३७/२०२४ | ०६.०८.२०२४ | आपल्या शाळेत कार्यरत असलेले श्री. विकास भगवान सोळंके यांनी अनुकंपावर कोणत्या आधारे घेतले, त्यनुसार त्यांची शिक्षण विभागाची प्रस्तावाच्या सत्य प्रतीत झेरॉक्स देण्यात याव्यात, आणि आपल्या संस्थेने घेतलेल्या ठरावाच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात. |

२. आज रोजी सुनावणीच्यावेळी उपस्थित बहुतांश जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांचा माहिती अधिकाराचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज कार्यालयात प्राप्त झालेला नाही. असे असतांना त्यांनी थेट द्वितीय अपील आयोगाकडे सादर केलेले आहेत. तसेच बहुतांश जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थीस

वेळोवेळी माहिती दिली असून व प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. अपिलार्थी यांच्या प्राप्त झालेल्या प्रस्तुत प्रकरणातील तसेच यापूर्वी सादर केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने सकारात्मक दृष्टिकोन ठेवून माहिती अधिकार कायदयास अभिप्रेत असलेली कार्यवाही करुन अपिलार्थीस वेळोवेळी कार्यालयात उपलब्ध असलेली व देय होणारी माहिती प्रदान केलेली आहे. तसेच बऱ्याच प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती मिळाली असे लेखी स्वरुपात मान्य करुनही त्यांनी विनाकारण आयोगाकडे द्वितीय अपिले सादर केलेली आहेत. या परिस्थितीत अपिलार्थी यांची सर्व विचाराधीन द्वितीय अपिले निकाली काढण्याची विनंती करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत प्रकरणात आयोगासमोर झालेला युक्तिवाद व अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी एकाच विषयाची वेगवेगळया प्राधिकरणाकडे एक सारखीच माहिती अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेले आहेत. या परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांना सर्व अर्जांना ३० दिवसात मुदतीत प्रतिसाद देताना त्याचा शासकीय कामावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा सर्रास दुरुपयोग करीत असून त्या आधारे विविध शासकीय प्राधिकरणाकडे दहशत निर्माण करणे हा त्यांचा हेतू आहे. त्यामुळे प्राधिकरणाच्या दैनंदिन प्रशासकीय कामकाजावर विपरीत परिणाम झाला असल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमक्ष सांगितले.

४. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या प्रस्तावनेमध्ये असे नमूद केले आहे की,

"ज्या अर्थी, लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी ज्या कार्यशिलतेच्या दृष्टीने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासनाने व त्यांचे यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने आवश्यक आहेत."

आणि ज्या अर्थी, प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटणामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनियता राखणे, या बाबींनाही बाधा येण्याची शक्यता आहे.

आणि ज्या अर्थी, लोकशाहीच्या आदर्शाची परमोच्चता कायम राखतांना, या परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे.

त्या अर्थी, आता माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नागरिकांना विविक्षत माहिती पुरविण्याकरिता तरतुद करणे इष्ट होईल. म्हणून शासकीय कामकाज सुचारु व सामोपचाराने चालविणे आणि माहिती अधिकाराचे कामाकाज सुसुत्रता यांचा ताळमेळ घालणे आवश्यक आहे.

५. प्रस्तुत प्रकरणातील सर्व माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी एक सारखीच माहिती वेगवेगळया प्राधिकरणाकडे मागितलेली आहे. मागणी केलेल्या अशा माहितीचा कालावधी मोठा आहे.

विस्तृत व्यापक व मोठया कालावधीची माहिती मागितलेली आहे. या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी त्या त्या प्राधिकरणाकडे सादर केलेल्या बहुतांश सर्व प्रथम अपिलामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी अपिल कर्त्याला वेळेवर माहिती दिली नाही, म्हणून अपिल दाखल करण्यात येत आहे, असे प्रयोजन नमूद केलेले आहे. यावरुन असे निदर्शनास येते की, संबंधीत अर्जदार यांनी संबंधीत प्राधिकरणाकडे नियम ३ व १९ (१) अन्वये अर्ज सादर न करता सदर अर्जाच्या छायांकित प्रती खंडपीठाकडे सादर करुन द्वितीय अपील दाखल केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. अपिलार्थी यांच्या अशा प्रवृत्तीमुळे शासन स्तरावर विपरीत परिणाम होतो. संबंधीत माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी गरज नसताना क्षेत्रीय कार्यालय खंडपीठासमोर सुनावणीस उपस्थित राहावे लागते. सदर बाब प्रशासकीय दृष्टीकोनातून योग्य नाही.

६. माहिती कायद्यामध्ये माहिती मागण्याबाबत कुठल्याही प्रकारचा प्रतिबंध नसला तरी माहितीचा मूळ उद्देश हा आहे की, शासकीय कामात पारदर्शकता आणून जनतेला माहिती मिळावी आणि शासकीय कामात कार्य तत्परता असावी असा आहे. वारंवार एकाच विषयावर वेगवेगळया प्राधिकरणाकडे माहिती अर्ज करुन शासकीय यंत्रणेस वेठीस धरण्याचा अपिलार्थी यांचा हेतू असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे शासकीम कामात अडथळा निर्माण होतो. तसेच शासकीय कामाकाजावरही विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो.

७. आयोगाने या प्रकरणी निर्णयाप्रत येताना, मा. सर्वोच्च न्यायालय, केंद्रीय माहिती आयोग, यांनी विविध प्रकरणात दिलेले न्यायनिवाडे, अधिनियमाची प्रस्तावना, अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे युक्तिवाद, त्यांनी सादर केलेले व प्रकरणात उपलब्ध असलेले अभिलेखे इत्यादी खाली नमूद केलेल्या बाबी विचारात घेतल्या आहेत.

(१). माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन अपिलार्थी यांनी वेगवेगळया सार्वजनिक प्राधिकरणाकडे सादर केलेले माहिती अर्ज, प्रथम अपिले व राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेली द्वितीय अपीलें यासाठी हेतुत: अवलंबलेली कार्यपध्दती याची पडताळणी अधिनियमाच्या प्रस्तावनेत नमूद तत्वांशी करण्यात आली. या अधिनियमाच्या प्रस्तावनेमध्ये असे नमूद केले आहे की,

"ज्या अर्थी, लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी ज्या कार्यशिलतेच्या दृष्टीने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासनाने व त्यांचे यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत. "

आणि ज्या अर्थी, प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटणामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि

संवेदनक्षम माहितीची गोपनियता राखणे, या बाबींनाही बाधा येण्याची शक्यता आहे.

आणि ज्या अर्थी, लोकशाहीच्या आदर्शाची परमोच्यता कायम राखतांना, या परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे.

त्या अर्थी, आता माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नगारिकांना विविक्षत माहिती पुरविण्याकरिता तरतुद करणे इष्ट होईल. म्हणून शासकीय कामकाज सुचारु व सामोपचाराने चालविणे आणि माहिती अधिकाराचे कामकाजात सुसूत्रता यांचा ताळमेळ घालणे आवश्यक आहे.

(२). मा.सर्वोच्च न्यायालयाने, सिव्हील अपील ६४५४/२०११, दिनांक ०९.०८.२०११ रोजी Appealicants Central Board of Secondary Education & Anr. Vs Aditya Bandopadhyay & Ors. Respondents या प्रकरणी खालील आदेश दिले आहेत.

"The Act should not be allowed to misused or abused, or to become a tool to abstract the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to the tot do their duty-Nation does not want a scenarios where ७५ % of the staff of public authorities spend ७५ % of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties under the RTI Act and pressure of the authorities under the Act should not lead to employees of a public authorities prioritizing information furnishing, at the cost of their normal and regular duties.

तसेच शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो. त्यानुसार प्रस्तुत कायद्याचा मुख्य उद्देश कामकाजात पारदर्शकता, सामान्य जनतेला / नागरीकांना माहिती मिळावी आणि जनतेने माहिती जाणून घेऊन शासकीय कामकाज कार्यक्षम होणे व त्यात समन्वय प्रस्थापित होणे हा आहे. जर अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा दुरुपयोग झाल्यास निश्चितपणे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य कार्यालयीन कामकाज सोडुन प्राप्त माहिती अर्जावर अधिनियमाप्रमाणे कामकाज करावे लागेल. त्यामुळे शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होऊन त्याचा विपरीत परिणाम शासकीय कामकाजावर होईल.

(३). मा.उच्च न्यायालय आंधप्रदेश, हैद्राबाद येथील रिट पिटीशन क्र.२०१८२, दिनांक २७.०१.२००९ मध्ये खालील आदेश दिलेले आहेत.

"The Act is an effective device which if utilized judiciously and properly, would help the citizens to become more informed. It no doubt relieves an applicant from obligation to disclose the reason as to why he wants the information. However, indiscriminate efforts to secure information just for the sake of it, and without there being nay useful purpose to serve, would only put enormous

pressure on the limited human resources, that are available. Diversion of such resources, for this task would obviously, be, at the cost of ordinary functioning. Beyond a point, it may even become harassment, for the concerned agencies. Much needs to be done in this direction to impart a sense of responsibility on those, who want to derive benefit under the Act to be more practical and realistic."

(४). केंद्रीय माहिती आयोगाने CIC/LS/२०१२/०००८५८-SA ते ०००८७२-SA संदर्भात दिनांक ०४.०७.२०१४ रोजी पारित केलेल्या आदेशात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

**Earlier Observation of CIC : Shri.M.M.Ansari**

In several occasions earlier the central information Commission referred to the issue of repeated RTI requests and harassing tendency. In Prem Prakash Kumar V NFL, Panipat, (Decision No.२४६/IC(A)२००६, F No.CIC/MA/A/२००६/००३७४ & ३७५ dated २८ Auguest २००६) the applicant sought documents and specific comments of CPIO on ८९ queries. The learned Commissioner Shri M.M.Ansari observed that in fact, the nature of queries and information sought are such that the information seeker would never be satisfied because the promotion of self-interest, rather than public interest, was dominant, as the appellant had sought redressed of grievances.

(५). तसेच तत्कालीन केंद्रिय माहिती आयुक्त मा.शैलेश गांधी यांनी No.CIC/SG/C/2011/000760, CIC/SM/2011/ 000926/ SG, CIC/SM/A/2011/001111/SG, CIC/SM/A/2011/002909, dated 17 th January, 2012) नमूद केले आहे की, अपिलार्थी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा उपयोग कायदेशीर हत्यार म्हणून करीत आहे. जो अत्यंत त्रासदायक स्वरुपाचा आहे. याबाबत खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

It is relevant here to quote a paragraph from the order of Learned Information Commissioner Shri Shailesh Gandhi in case numbers No.CIC/SG/C/२०११/०००७६०, CIC/SM/२०११/ ०००९२६/ SG, CIC/SM/A/२०११/००११११/SG, CIC/SM/A/२०११/००२९०९, dated १७ th January, २०१२) in a second appeal "The commission, at several appellate hearing, has explained to the complainant that under RTI Act, only the information as per records can be made available, multiple RTI applications and appeals would not provide him any information beyond the records that exists. The Commission recognizes the fact that valuable time of complainant, respondent public authority as well as the Commission is being spent in merely going through the motion prescribed under the RTI Act again and again to obtain similar information..... At this juncture the **Commission would like to mention that the right to information is a fundamental right of the citizens, It cannot be used indiscriminately to fulfill the demand of one individual.** In the present matter. It must be noted that the complainant is pursuing multiple litigation and various public authorities are being asked to divert and extraordinarily disproportionate amount of

resources just to respond to hundreds of RTI applications filled by him....The Commission is also conscious of the fact that it is financed by the poorest man in this country who may be starving to death. The Complainant by repeatedly filling similar RTI application and appeals with the respondent public authority and the commission, is wasting public resources." तसेच नमूद केले आहे की, वारंवार माहिती अर्ज करणारे अर्जदार हे माहितीची मागणी / प्रकटीकरण हे त्यांच्या अंतस्थ व्यक्तिगत हेतू साध्य करण्यासाठी करतात, त्यामध्ये व्यक्तिगत हिताचा विचार असल्याने सार्वजनिक हित साध्य होणार नसते. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नमूद वैधानिक उद्देश स्पष्टपणे साध्य होत नाही.

८. प्रस्तुत अपील प्रकरणी निर्णयाप्रत येण्याच्या प्रक्रियेपुर्वी उपरोक्त वर परिच्छेद क्रमांक ५ मध्ये नमूद बाबी विचारात घेण्यात येत आहेत.

१). माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये नमूद तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती मागण्याबाबत कुठल्याही प्रकारचा प्रतिबंध नसला तरी, शासकीय कामात पारदर्शकता आणून जनतेला माहिती मिळावी आणि शासकीय कामात कार्य तत्परता असावी, असा या कायद्याचा मुख्य हेतु आहे. तथापि अपिलार्थी यांनी विपरीत भूमिका घेऊन माहिती अधिकार अधिनियम, २००५ या कायद्याचा दुरुपयोग करण्यासाठी सुनियोजित पध्दतीने अनेक सार्वजनिक प्राधिकरणांकडे जाणीवपुर्वक अतिविस्तृत, दिर्घकालावधीची, मोघम स्वरुपाच्या माहितीची मागणी करण्यासाठी मोठया संख्येने माहिती अर्ज, प्रथम अपीले व त्या अनुषंगाने मोठया संख्येने आयोगाकडे द्वितीय अपीले सादर केली आहेत.

२) अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ चा वापर करुन मोठया संख्येने माहिती अर्ज, प्रथम अपिले आणि द्वितीय अपीले सादर करण्याच्या या कृतीशी कोणते व्यापक जनहित निगडित आहे हे नमूद केलेले नाही, याबाबत तसेच अपिलार्थी सुनवणीसाठी उपस्थित राहिले नाहीत.

३) अपिलार्थी यांनी त्यांना प्राप्त झालेल्या अधिकाराचा (माहिती अधिकार) माफक पध्दतीने वापर करणे आवश्यक असूनही, त्यांनी माहिती अधिकार कायद्याचा जाणीवपुर्वक अनिर्बंध व अवाजवी दुरुपयोग केला आहे.

४) अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ या कायद्याचा अनिर्बंध व अवाजवी वापर केला असल्याने संबंधित शासकीय कार्यालये/ प्राधिकरणे यांचा बहुमुल्य वेळ, साधनसामग्री व शक्ती अधिक प्रमाणात खर्ची पडून सदर शासकीय कार्यालयाकडून सर्व सामान्य जनतेला ज्या सेवा देणे अभिप्रेत आहे त्या महत्वाच्या दैनंदिन शासकीय कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे.

५) अशा मोठया प्रमाणावर अर्ज करण्याच्या कार्यपध्दतीमुळे गरजवंत अर्जदारांवर अन्याय होऊन माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या प्रभावी अंमलबजावणीस गतीरोधक निर्माण होत आहे. त्याचा निश्चितपणे कार्यालयीन कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे.

उपरोक्त सर्व बाबी तसेच मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय व मा. केंद्रीय माहिती आयोगाकडील अशा प्रकरणी वेळोवेळी दिलेले, ऐतिहासिक, क्रांतीकारी व लक्ष्यवेधी निर्णय विचारात घेता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत नाही. वारंवार मोठया प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येऊन सर्वसामान्य नागरिकांच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होत आहे. तसेच संबंधित शासकीय विभागाचा / प्राधिकरणांचा बहुमूल्य वेळ वाया जात असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत आहे. ही बाब माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत आहे. म्हणून अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपिलांमध्ये कोणतेही तथ्य किंवा गुणवत्ता आढळून येत नसल्यामुळे व त्यातून कोणतेही जनहित साध्य होत नसल्यामुळे सर्व ३६ द्वितीय अपिले कोणत्याही निर्देशाविना फेटाळण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

उपरोक्त पार्श्वभूमिवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थी यांची सर्व ३६ द्वितीय अपिले फेटाळण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना यांना निर्देशित करण्यात येते की, प्रस्तुत आदेशाची जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा जालना यांचेमार्फत व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच सदर आदेश आपल्या अधिनस्त कार्यालयातील सूचना फलकावर लावण्यात यावा.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 6270 दिनांक : 18/6/2025

प्रत : माहितीसाठी तथा यथाशिघ्र कार्यवाहीसाठी अग्रेषित
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५०१०/२०२४**
**बोर्ड क्र. ७७**

श्री. सैय्यद मोबिन उद्दीन सैय्यद अल्लाउद्दीन, — अपिलार्थी
रा. घर क्र.१-१२-७१ जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
कै. मारोतराव देशमुख विद्यालय, टेंभूर्णी,
ता. जाफ्राबाद, जि. जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याध्यापक,
कै. मारोतराव देशमुख विद्यालय, टेंभूर्णी,
ता. जाफ्राबाद, जि. जालना

**(सुनावणी दिनांक ०३.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१५.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १४.०२.२०२४ | अ.श्री. एस.जी. एंडोले सहशिक्षक यांची सेवेत नियुक्ती संदर्भात प्रसिध्द झालेल्या वर्तमानपत्रातील जाहिरातीची सत्यप्रत देण्यात यावी,<br>ब. श्री. एस.जी. एंडोले सहशिक्षक यांची जातीच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत देण्यात यावी, तसेच पडताळणी (Cast Validity) झाली असल्यास त्याची सत्यप्रत देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक माहिती मागितलेली असल्यामुळे देता येत नाही असे दि.०९.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. देय होणारी काही माहिती संकलीत करुन आज रोजी सोबत आणलेली आहे. आपल्या आदेशाप्रमाणे अपिलार्थीस देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाला नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांना देण्यात आली अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारलेली आहे. अपिलार्थी यांना सुनावणीदरम्यान माहिती दिलेली असल्यामुळे अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6194 दिनांक : 16/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक, ११०२०/२०२४**
**व ११०२१/२०२४**
**बोर्ड क्र. ७८ ते ७९**

श्री. सैय्यद मोबिन उद्दीन सैय्यद अल्लाउद्दीन, — अपिलार्थी
रा. घर क्र.१-१२-७१ जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
कै. मारोतराव देशमुख विद्यालय, टेंभूर्णी,
ता. जाफ्राबाद, जि. जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याध्यापक,
कै. मारोतराव देशमुख विद्यालय, टेंभूर्णी,
ता. जाफ्राबाद, जि. जालना

**(सुनावणी दिनांक ०३.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२६.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.०९.२०२४ | अ. श्री. एस.जी. एंडोले यांचे पुर्ण नाव देण्यात यावी,<br>ब. श्री . एस.जी. एंडोले यांनी मौजे म्हसरुळ, ता. जाफ्राबाद येथील गट क्र.१७१ सर्वे नं.३ या मिळकती मध्ये एकूण किती जागेवर अतिक्रमण केले आहे करीता त्याचे क्षेत्रफळ देण्यात यावी.<br>क. श्री. एस.जी. एंडोले यांनी मौजे म्हसरुळ, ता. जाफ्राबाद येथील गट क्र.१७१ सर्वे नं.३ मधील ७/१२ उताऱ्याला पिक पेऱ्याची नोंद (ब) ला घेणे बाबत तहसिलदार जाफ्राबाद यांच्या कार्यालयात प्रकरण दाखल केला होता करीता त्या दाखल केलेल्या प्रकरणाचे |

| | |
|---|---|
| | क्रमांक व दिनांक देण्यात यावी.<br>ड. श्री. एस.जी.एंडोले यांनी मौजे म्हसरुळ ता. जाफ्राबाद येथील गट क्र.१७१ सर्वे नं.३ या मिळकती मधील ७/१२ उताऱ्याला पिक पेऱ्याची नोंद ७ (ब) ला घेण्यासाठी कोणत्या कार्यालयात प्रकरण दाखल केला आहे. करीता त्या दाखल केलेल्या प्रकरणाचे क्रमांक व दिनांक देण्यात यावी. |
| १०.०९.२०२४ | अ. श्री.एस.जी.एंडोले यांनी मौजे म्हसरुळ येथील गट क्र १७१ सर्वे नं.३ या मिळकतीवर पीक पेरणी करुन आजपर्यंत एकूण किती पैसे कमावले आहे करीता त्या पैशाचा केवळ आकडा देण्यात यावी.<br>ब. श्री. एस.जी. एंडोले यांनी मौजे महसरुळ ता जाफ्राबाद, येथील गट क्र.१७१ सर्वे नं.३ या मिळकतीच्या ७/१२ वर नोंद घेण्यासाठी अर्ज सोबत जे जे जमिनीचे पुरावे तलाठी व तहसिल कार्यालयात दाखल केले होते करीता त्या सर्व कागदपत्राचे सत्यप्रत देण्यात यावी.<br>क.श्री एस.जी.एंडोले यांच्या विरोधात ज्यांनी ज्यांनी कुठल्याही प्रकरणाबाबत तक्रार अर्ज दिले असेल तर करीता त्या सर्व तक्रार अर्जाचे कागदपत्राचे सत्यप्रत देण्यात यावी.<br>ड. श्री. एस.जी. एंडोले यांच्या विरोधात दिवाणी किंवा फौजदारी स्वरुपाचे प्रकरण ज्या ज्या कार्यालयात किंवा न्यायालयात प्रकरण प्रलंबित असेल तर करीता त्या विषयाची माहिती देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, वैयक्तिक स्वरुपाची माहिती असल्यामुळे देता येत नाही असे कळविलेले आहे.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आमच्या कार्यालयाशी संबंधीत नसून ती तहसील कार्यालयाशी संबंधीत आहे असे अपिलार्थी यांना वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, या दोन्ही प्रकरणी श्री. सय्यद रफिक सय्यद लाल यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे जोडपत्र-अ नुसार माहिती अर्ज सादर केलेला असून प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील व आयोगाकडे द्वितीय अपील हे श्री. सैय्यद मोबिन उद्दीन सैय्यद अल्लाउद्दीन यांनी सादर केलेले आहेत.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ नुसार भारतातील प्रत्येक नागरिकाला माहितीचा अधिकार प्राप्त झालेला आहे. त्यानुसार व्यक्तीस माहितीची आवश्यकता आहे. तो प्रत्येक व्यक्ती माहिती अधिकारा अंतर्गत माहितीची मागणी करु शकतो. मात्र ज्या व्यक्तीने माहितीचा अर्ज सादर केलेला आहे त्याच व्यक्तीने पुढील प्रथम व द्वितीय अपील दाखल करणे अभिप्रेत आहे. या दोन्ही प्रकरणी वेगवेगळया व्यक्तीने माहिती व प्रथम अपील, द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त दोन्ही द्वितीय अपिले फेटाळण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6195 दिनांक : 16/06/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६२११/२०२४**
**बोर्ड क्र.८०**

श्री. मनोहर बाबाराव धोंडे, — अपिलार्थी
रो हाऊस नं.सी-५, खिंवसरा फोर्ट, रिध्दी सिध्दी हॉलच्या पाठीमागे, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर-४३१००५.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य, प्लॉट नंबर ०८, हॉटेल विकास लॉज छत्रपती संभाजीनगर रोड, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सह आयुक्त,
अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य २ रा मजला गट क्र.१९, पैठण रोड, कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०३.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०७.०६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १३.०३.२०२४ | दि.०२.०८.२०२३ ते अजापर्यंत या कालावधीतील श्री. चरणसिंह बाबुसिंह कचोर, प्लॉट नंब.५ माऊली नगर मातोश्री लॉंच समोर अंबड रोड जालनाच्या खाजगी बसतीगृहात निष्कृष्ठ दर्जाचे जेवणाबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आपण केलेली कार्यवाही जेवणाचे घेतलेले नमुन्याचे आलेले रिपोर्ट सह याबाबतच्या संपूर्ण नस्ती देणेबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.०८.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, कलम ७(१), ७(७) कलम ११ च्या तरतुदीनुसार मागणी केलेली उक्त माहिती देणे शक्य होत नाही असे कळविल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आयोगास योग्य दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीने कोणते जनहित साध्य होणार आहे हे त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केल्याचे दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील फेटाळण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6196 दिनांक : 16/06/2025